# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## परिपत्रक

**"राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना"**

आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांकडून प्रवेशाच्यावेळी १०० टक्के शुल्क घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या शिक्षण शुल्काची ५० टक्के रक्कम विद्यार्थ्यास तात्काळ परत करणेबाबत.

या परिपत्रकाद्वारे सर्व संबंधिताना कळविण्यात येते की, शासनाने "राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना" व "डॉ. पंजाबराव देशमुख निर्वाह भत्ता योजना" आणि शासनाच्या अखत्यारितील शिष्यवृत्तीच्या इतर योजनांसाठी पात्र असलेल्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांकडून शिक्षण शुल्काची रक्कम न घेण्याबाबत आदेश दिलेले आहेत याबाबत विद्यापीठाने परिपत्रक दि. १४/०७/२०१८, १०/०९/२०१८ व दि. १४/०९/२०१८ अन्वये सर्व संबधिताना स्पष्ट सूचना दिलेल्या आहेत. तथापी, याबाबत अद्यापही अंमलबजावणी होत नसल्याच्या तक्रारी विद्यापीठात प्राप्त होत आहे.

मान्यताप्राप्त व्यवसायिक व बिगर व्यवसायिक अभ्यासक्रमामध्ये शिकणाऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील पात्र विद्यार्थ्यांसाठी "राजर्षी शाहू महाराज शिक्षण शुल्क योजना" व "डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना" तसेच मागासवर्ग प्रवर्गासाठीच्या शासनाच्या विविध शिष्यवृत्ती/फ्रिशिप योजना https://mahadbtmahait.gov.in या संकेतस्थळावर कार्यान्वित करण्यात आलेल्या आहेत. सदर योजनांची प्रभावीपणे अंमलबजाणी करण्याबाबत शासनाने तसेच विद्यापीठाने वेळोवेळी सुचना दिलेल्या आहेत.

तरी, वरील शिष्यवृत्ती योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी व्हावी तसेच जे विद्यार्थी वरील शिष्यवृत्तीसाठी पात्र आहेत मात्र, त्यांच्याकडून १०० टक्के शिक्षण शुल्क आकारण्यात आलेले असेल अशा विद्यार्थ्यांना शासनाने दिलेल्या आदेशानुसार ५० टक्के शिक्षण शुल्काची रक्कम परत करण्याबाबत कार्यवाही व्हावी. व केलेल्या कार्यवाहीची माहिति त्वरीत या कार्यालयास सादर करावी.

४/१०/२०१८.

उपकुलसचिव,
शैक्षणिक प्रवेश विभाग

गणेशखिंड पुणे – ७ }
संदर्भ : शै. प्रवेश/४०३९ }
दिनांक : ०४/१०/२०१८ }

प्रत:

मा. विभागप्रमुख/संचालक, विद्यापीठ शैक्षणिक विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.
मा. प्राचार्य/संचालक, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्नित महाविद्यालय/संस्था.